जनमाध्यम दि. ०६/१०/१५

# विद्यापीठात आता परीक्षा सुविधाकेंद्र

**अमरावती/का.प्र.**

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या परीक्षा मंडळाने विद्यार्थ्यांची गैरसोय टाळण्यासाठी परीक्षा सुविधाकेंद्र स्थापन करण्याचा निर्णय घेतला.

विद्यापीठांतर्गत पश्चिम विदर्भात ४१२ महाविद्यालये आहेत. विद्यापीठाकडून सहाशेहून अधिक परीक्षांचे नियोजन दरवर्षी करण्यात येते. विद्यापीठांशी संलग्न असलेल्या महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांची संख्या ४ लाखांच्या घरात आहे. विद्यापीठ नियोजन करीत असलेल्या परीक्षेसंदर्भात माहिती जाणून घेण्यासाठी अकोला, बुलडाणा, वाशीम, यवतमाळ व अमरावती जिल्ह्यातील मेळघाटसारख्या दुर्गम भागातून विद्यार्थी विद्यापीठात येतात. त्यांना परीक्षेसंदर्भात आवश्यक माहितीसाठी विद्यापीठात भटकावे लागते. योग्य माहिती मिळाली नाही तर त्यांच्या वेळ व पैसा वाया जातो. परीक्षेसंदर्भात माहिती मिळत नसल्याच्या अनेक तक्रारी होत्या. मधल्या काळात परीक्षा विभागाला गुणवा प्रकरणाच्या त्रासाने चांगलेच ग्रासलेले होते. त्यामुळे विद्यापीठाचा परीक्षा विभाग पोलीस तपसात गुंतून पडला होता. या दरम्यान विद्यार्थ्यांची प्रचंड गैरसोय झाली. यामुळे दररोज विद्यापीठाकडे विद्यार्थ्यांच्या अनेक तक्रारी प्राप्त होत असत. परीक्षेसंदर्भातील विद्यार्थ्यांना आवश्यक असलेली माहिती मिळावी म्हणून परीक्षा मंडळाने परीक्षा सुविधाकेंद्र सुरु करण्याच्या निर्णय घेतला. परीक्षा विभागाच्या बाजुलाच हे सुविधाकेंद्र राहणार आहे. येथे परीक्षांचे वेळापत्रक, पुनर्मूल्यांकन, परीक्षा आवेदनपत्र, परीक्षांचे निकाल आणि परीक्षा शुल्कासंदर्भातील माहिती विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात येईल. परीक्षा विभागाचा वाढता व्याप पाहून परीक्षा मंडळाने परीक्षा सुविधाकेंद्र सुरु करण्याचे ठरविले.



**महाविद्यालयांशी ऑनलाईन सुविधाकेंद्र**

विद्यापीठातील परीक्षा विभागालगत सदरचे सुविधाकेंद्र सुरु होणार आहे. या केंद्रात पाच कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली. त्यात तंत्रज्ञांचाही समावेश राहील. सुविधाकेंद्र हे महाविद्यालयाशी ऑनलाईन जोडण्यात येणार असून; त्यांना ऑनलाईन माहिती उपलब्ध करून देण्यात येईल. प्रत्यक्ष विद्यार्थी केंद्रावर माहितीसाठी आल्यास त्यालाही माहिती देण्यात येणार असल्याचे परीक्षानियंत्रक डा. [illegible] यांनी सांगितले.